# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

**दूरध्वनी : (०२२)२२१५ १८४७, फॅक्स :(०२२)२२१५१८६७.** **ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in**


जा. क्र./मरासुम/प्रशासन/८४५/२०२१ दि. २२/०४/२०२१.

**विषय :- ओळखपत्र प्रिंट करून पुरविणे करीता पुरवठादार निश्चित करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या कार्यालयीन कर्मचारी तसेच सुरक्षा अधिकारी/रक्षक यांना ओळखपत्र प्रिंट करून पुरविणेकरिता वार्षिक वित्तीय वर्ष एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ करिता पुरवठादार निश्चित करण्याचे प्रस्तावित आहे.

इच्छूक पुरवठादारकांनी महामंडळाने सोबत सादर केलेल्या मुख्यालयास आवश्यक त्या ओळखपत्राचा नमुना क्लीप, कव्हर व लेस सहचे दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात कार्यालयाच्या उपरोक्त पत्यावर दि. १०/०५/२०२१ रोजी १८.०० वाजेपर्यंत सादर करावी त्यानंतर येणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

ओळखपत्राच्या नमुन्या करीता तसेच अधिक माहिती करिता www.mahasecurity.gov.in व maharashtra.gov.in वेबसाईटला भेट द्यावी.

या प्रक्रिये संदर्भातील अंतीम निर्णय महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचा राहिल.

Sd/-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

जा. क्र./मरासुम/प्रशासन/८४५/२०२१ दि. २२/०४/२०२१.

# नोटीस

## ओळखपत्र प्रिंट करून पुरविणे करीता पुरवठादार निश्चित करणेबाबत.


**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ**

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

**दूरध्वनी : (०२२)२२१५ १८४७, फॅक्स :(०२२)२२१५१८६७.**

**ई मेलः- info.mahasecurity@maharashtra.gov.in**

## १) परिचय

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे शासनाचे वैधानिक महामंडळ, असुन महामंडळातर्फे महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील आस्थापनांना सुरक्षारक्षकां मार्फत सशस्त्र सुरक्षा व संरक्षण पुरविले जात आहे.

महाराष्ट्र राज्य पोलीस दलाला कायदा व सुव्यवस्था, गुन्हेगारी, गुन्हे नियंत्रण, दहशतवादी हल्ला रोखण्यासाठी तसेच पोलीसांना नेमुन दिलेल्या इतर कर्तव्यासाठी मुक्त करून त्या ठिकाणी फक्त संरक्षण व सुरक्षा प्रदान करण्यासाठी विशेषरित्या प्रशिक्षित अधिकारी व जवानाची नेमणुक करण्याच्या विशिष्ठ उद्देशाने महाराष्ट्र शासनाने सन २०१० साली, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, अधिनियम २०१० अन्वये, या महामंडळाची निर्मिती केलेली आहे.

महामंडळाचे मुख्यालयात नियुक्त कार्यालयीन कर्मचारी तसेच महामंडळा अंतर्गत महाराष्ट्रातील विविध आस्थापनांवर कार्यरत असलेले सुरक्षा अधिकारी/कर्मचारी यांना महामंडळाचे कर्मचारी म्हणून ओळखपत्र दाखविणे तसेच त्यांची वैयक्तीक माहिती जाणून घेणे हेतू महामंडळामार्फत नियुक्त अधिकारी/कर्मचारी तसेच सुरक्षा रक्षक यांना ओळखपत्र अदा करण्यात येते; त्या अनुषंगाने ओळखपत्र पुरविणे करीता पुरवठादार निश्चित करण्याचीबाब येथे प्रस्तावित आहे.

## २) दरपत्रक पाठविणे करिता व उघडणेकरीता हजर रहावयाचे असल्यास पत्ता व दुरध्वनी क्र. :-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी : (०२२)२२१५ १८४७, फॅक्स :(०२२)२२१५१८६७.

## ३) महत्तवाच्या दिनांक व वेळ :-

१. दरपत्रके सादर करण्याची शेवटची दिनांक - दि. १०/०५/२०२१ व वेळ १८.०० वाजेपर्यंत.

२. दरपत्रके उघडणेकरीताची दिनांक - दि. ११/०५/२०२१ व वेळ ११.०० वाजता.

## ४) सूचना :-

कृपया दरपत्रक सादर करणेपुर्वी खालील सूचना काळजीपुर्वक वाचाव्यात.

१. इच्छूक पुरवठादारकांनी एका वेळेस एकच दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे. एका पुरवठादाराची अनेक दरपत्रक प्राप्त झाल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही.

२. अंतीम दिनांका नंतर प्राप्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

३. पुरवठादाराने दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

४. पुरवठादाराने दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सादर करावीत.
५. मुख्यालयास आवश्यक ओळखपत्र नमुना तसेच त्याचे (Specification) सोबत सादर करण्यात येत आहे.
६. सोबत जोडलेल्या नमुन्याचे ओळखपत्र वर्षाला साधारणत नग-१००० संख्येत मध्ये आवश्यकता भासणार असल्याने पुरवठादाराने सदरची नग संख्या लक्षात घेऊन आपले दर सादर करावेत.
७. जे पुरवठादार सोबत जोडलेल्या ओळखपत्राचा नमुना अथवा मॉडेल पाहू इच्छीत आहेत त्यांनी खालील कार्यालयाच्या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत ९.४५ AM ते ६.१५ PM मध्ये संपर्क साधावा.
८. जे पुरवठादार सोबत जोडलेल्या नमुन्याचे ओळखपत्र नमुद दर्जा नुसार पुरवू शकत असतील त्यांनीच दरपत्रक सादर करावीत.
९. सोबत जोडलेला ओळखपत्राचा नमुना मरासुम कार्यालयास साधारण आवश्यक ओळखपत्रांच्या नग संख्येनुसार त्यावर आकारण्यात येणाऱ्या GST तसेच इतर करासह दर व दर्जा नमुद करावा.
१०. सोबत जोडलेल्या नमुन्या व्यातीरिक्त मुख्यालयाने भविष्यात अन्य कोणत्या ओळखपत्राचा नमुना मंजूर केल्यास त्या नमुन्याचे ओळखपत्र सध्यस्थितीत देण्यात येणाऱ्या दर व दर्जा नुसारच देणे आवश्यक आहे.
११. कोणत्याही कारणास्तव जाहिरात पुर्णपणे किंवा अंशत: रद्द करण्याचा अधिकार महामंडळाकडे आहे. आणि इच्छूक पुरवठादारकांनी दरपत्रक सादर केल्यावर जाहिरात रद्द केल्यास त्याबाबतची सूचना कळविली जाणार नाही.
१२. पुरवठादारकांची निवड केल्यानंतर त्यांना महामंडळास पुरवठा करणे बंद करावयाचा असल्यास ३० दिवस आधी लेखी सूचना द्यावी.

## ५) निवड प्रक्रिया :-

१) जे पुरवठादार महामंडळास आवश्यक ओळखपत्र विथ क्लीप, कव्हर, लेस उत्तम दर्जाचे व कमी दरात देण्यास इच्छूक आहेत अशा पुरवठादारकांची निवड यादी तयार करण्यात येईल.
२) निवड प्रक्रिये दरम्यान आवश्यकता भासल्यास (Negotiation) वाटाघाटी संदर्भात पुरवठादाराशी चर्चा करणे हेतू कार्यालयास हजर रहावे लागेल.
३) निवड केलेल्या पुरवठादारकांस निवड केल्याचे पत्र ई-मेल आय-डीद्वारे तसेच पत्राद्वारे कळविले जाईल.
४) निवड केल्याचा निकाल, MSSC च्या www.mahasecurity.gov.in या संकेतस्थळावर दिसून येईल.
५) निवडलेल्या पुरवठादारकास ओळखपत्र पुरवठाकरावयाच्या अटी व शर्थीसह नियुक्ती पत्र दिले जाईल.

**६) <u>पुरवठादारकांनी सादर करावयाची कागदपत्र :-</u>**

१) निवड केलेल्या पुरवठादाराने दुकानाच्या नावे आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करणे हेतू, कागदपत्रांची साक्षांकीत कॉपीचा एक सेट सोबत जोडून सादर करणे आवश्यक आहे.

२) दुकान मालकाचे पासपोर्ट आकाराचे दोन फोटो.

३) ओळखपत्र जसे की, पॅनकार्ड/आधार कार्ड/पासपोर्ट/मतदार ओळखपत्र इ.

४) ओळखपत्र पुरवित असलेल्या विविध कंपन्यांचे अनुभव प्रमाणपत्र.

५) GST करासंबंधीत आवश्यक सर्व कागदपत्र.

**सदर निवड प्रक्रिया कोणत्याही वेळी/कोणत्याही कारणास्तव/कोणत्याही टप्प्यावर/ पुर्णतः किंवा अंशतः रद्द करण्याचा/फेरबदल करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.**

Sd/-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

**सदरचा तक्ता किंमतीसह बंद लिफाफ्या मध्ये महामंडळाच्या कार्यालयास सादर करावा.**

## ओळखपत्र - (Specification)

| | |
|---|---|
| **ओळखपत्र** | **१.** दर्जा - PVC I Card Lamination Coted ATM Type<br>**२.** प्रिंटींग बाजू - कार्डाच्या दोन्ही बाजूस प्रिंटींग करावी लागणार आहे.<br>**३.** साईज - पॅनकार्ड साईज - साधारणत ८.६ cm x ५.४ cm |
| **ओळखपत्रांचे कव्हर** | **१.** दर्जा - प्लास्टीक ट्रान्सफरंन्ट कव्हर<br>**२.** साईज - ८.८ cm x ५.६ cm<br>**३.** क्लीप - मेटल क्लीप |
| **ओळखपत्रांची लेस** | **१.** दर्जा - नायलॉन लेस<br>**२.** रंग - निळा रंग<br>**३.** साईज - १७ cm x १.४ cm<br>**४.** प्रिंटींग बाजू - लेसच्या एका बाजूने<br>**५.** प्रिंटींग रंग - सफेद रंगाने लेसच्या एका बाजूने कार्यालयाचे नाव प्रिंट करावयाचे असेल. |
| **वर्षाला ओळखपत्रांचा पुरवठा संख्या** | १००० नग |
| **प्रत्येकी एक नग ओळखपत्राची किंमत** | |